महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर https://jeevandeepvarta.com मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे Rs.2/-

गुरूवार ■ 30 जानेवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 215 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024




# म्हाडाच्या माध्यमातून दोन वर्षात एक लाख घरे उभारणार

## -उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### म्हाडा पुणे मंडळातर्फे ३६६२ सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत

दै· ठाणे जीवनदीप वार्ता

म्हाडा पुणे मंडळातर्फे ३६६२ सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत उत्साहात मुंबई, दि. २९:सर्वसामान्य नागरिकांच्या गृहस्वप्नपूर्तीसाठी महाराष्ट्र शासन कटीबद्ध असून येत्या दोन वर्षात म्हाडाच्या माध्यमातून राज्यात सुमारे एक लाख घरांच्या उभारणीसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहे. सदर उद्दिष्टपूर्तीसाठी राज्याचे गृहनिर्माण धोरण देखील लवकरच जाहीर करण्यात येणार आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी आज केले. पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा घटक) पुणे, पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीएसह सोलापूर जिल्ह्यातील विविध गृहनिर्माण योजनेतील ३,६६२ सदनिकांच्या विक्रीकरिता संगणकीय सोडत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री तथा पुणे पालकमंत्री श्री. अजित पवार, गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, म्हाडा पुणे मंडळाचे सभापती श्री. शिवाजीराव आढळराव पाटील, 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या प्रमुख उपस्थितीत ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातून दूरदृश्य प्रणालीद्वारे काढण्यात आली. यावेळी श्री. शिंदे बोलत होते. या प्रसंगी उपमुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले की, देशाच्या अर्थव्यवस्थेला उभारी देण्याकरिता केंद्र सरकार देशभरात चार राज्यांमध्ये ग्रोथ हब उभारणार आहे. यापैकी एक मुंबई महानगर क्षेत्रात आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात उद्योग, आयटी कंपन्या, सेवा क्षेत्रांचा समावेश असणार आहे. ज्यामुळे मोठ्या प्रमाणात अधिकारी कर्मचारी वर्ग निर्माण होणार आहे. या पार्श्वभूमीवर म्हाडा तब्बल आठ लाख घरे उभारणार आहे. तसेच योजनाबद्ध गृहनिर्मिती अंतर्गत भाडेतत्वावरील घरे आणि नोकरी करणाऱ्या महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी ठिकठिकाणी वसतिगृह देखील उभारले जाणार आहेत, अशी माहिती श्री शिंदे यांनी दिली. तसेच ते पुढे म्हणाले की मुंबई शहराच्या भौगोलिक सीमा लक्षात घेता समूह पुनर्विकासद्वारे ईको-फ्रेडली गृहनिर्मितीवर देखील भर दिला जाणार आहे. तसेच ते म्हणाले की, राज्यातील नागरिकांच्या हक्काच्या घराचे स्वप्न म्हाडाच्या माध्यमातून पूर्ण होत आहे याचा आनंद आहे. म्हाडा पुणे मंडळाच्या ३६६२ सदनिकांच्या विक्रीसाठी आयोजित सोडतीमध्ये अनामत रकमेसह ७१,६४२ अर्ज प्राप्त झाले आहेत. अर्जदारांनी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडाच्या) पारदर्शक कार्यप्रणालीवर दाखवलेला हा विश्वास आहे. अर्जदारांचा हाच विश्वास सार्थ ठरवण्यासाठी घरांची गुणवत्ता व सोडतीच्या पारदर्शकतेमध्ये कुठेही तडजोड न करता सोडतीतील विजेत्या अर्जदारांना तात्काळ सदनिकांचा ताबा देण्यात यावा, असे संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी निर्देशित केले. महाराष्ट्र शासन विविध योजनांच्या माध्यमातून परवडणाऱ्या घरांची निर्मिती करीत आहे. 'म्हाडा'ने गेल्या दीड वर्षात १३ सोडतींच्या माध्यमातून सुमारे ३० हजार घरे उपलब्ध करून दिली आहेत, ही कौतुकास्पद बाब असल्याचे ते म्हणाले. रखडलेले गृहनिर्माण प्रकल्प मार्गी लागावेत व झोपडपट्टी पुनर्विकास व्हावा यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणात गृहसाठा उपलब्ध होणार आहे. मुंबई पुणे, ठाणे या शहरांमध्ये समूह पुनर्विकास योजनेद्वारे योजनाबद्ध गृहनिर्मिती करण्यासाठी शासनातर्फे प्रयत्न केले जात असल्याचे श्री. शिंदे यांनी सांगितले. पुणे येथे देखील समूह पुनर्विकास योजना राबवण्याचे सुतोवाच श्री. शिंदे यांनी केले.

याप्रसंगी राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी पुणे मंडळाच्या आजच्या सोडतीला लाभलेला उत्तुंग प्रतिसाद म्हणजे राज्यात परवडणाऱ्या दरातील घरांची गरज अधोरेखित होते. तसेच म्हाडाच्या पारदर्शक सोडत प्रणालीवर नागरिकांचा विश्वास देखील दर्शविते. म्हाडाचा लाभार्थी हा म्हाडासाठी मोठी गुंतवणूक असून सदर लाभार्थी हेच म्हाडाचे ब्रँड अँबेसिडर आहेत असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

- जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) 2024-25 अंतर्गत मंजूर नियतव्यय ₹938.00 कोटी पैकी बीम्स प्रणालीवर रु. 375.20 कोटी निधी प्राप्त झाला आहे. प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण 69 टक्के असून तसेच आदिवासी उपयोजना व अनुसूचित जाती उप योजना अंतर्गत सुध्दा अनुक्रमे 67% व 90% खर्च करण्यांत आला आहे. मार्च, 2025 मध्ये 100% निधी खर्च करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.
- सदर निधीतून जिल्ह्यातील करण्यात येणारी विकास कामे ही वेळेत, जनतेच्या हिताची व गुणवत्तापूर्ण करून 100% टक्के निधी खर्च करण्याच्या सक्त सूचना संबंधित विभाग प्रमुखांना देण्यात आल्या आहेत.
- महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था सन 2030 पर्यंत एक ट्रिलियन डॉलर एवढी करण्याची ध्येय ठेवण्यात आलेले आहे. ठाणे जिल्हा हा अग्रस्थानी राहण्याच्या दृष्टीने सध्याची ठाण्याची अर्थव्यवस्था जी 48 बिलियन डॉलर आहे ती 2030 अखेर 150 बिलियन डॉलर एवढी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. 'जिल्हा वार्षिक योजनेचा' सन 2025 आराखडा जिल्ह्याची अर्थव्यवस्था सुधारण्याकरिता पूरक अशा बाबींवर भर देऊन तयार करण्यात आला आहे.
- सदर आराखडा शासनास सादर करून राज्यस्तरीय बैठकीमध्ये यामध्ये भरघोस वाढ होईल याकरिता निश्चितच प्रयत्न करण्यात येतील.
- जिल्ह्यातील एकूण १३२८ जिल्हा परिषद शाळांपैकी १२० शाळांमध्ये cctv उपलब्ध होते. cctv उपलब्ध नसलेल्या १२०८ शाळांमध्ये जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून तातडीने cctv बसविण्यात येत आहेत.

# पालघर मधील शिक्षकांच्या ठाणे जिल्ह्यात बदल्या करा

## आ किसन कथोरेंची जिल्हा नियोजन समितीत मागणी

दै· ठाणे जीवनदीप वार्ता



आज झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आमदार किसन कथोरे यांनी ठाणे जिल्ह्याचा विभाजनामुळे मूळ ठाणे जिल्ह्यातुन पालघर जिल्ह्यात विकल्प विपरीत शिक्षक गेलेले आहेत अशा शिक्षकांना शासनाने तातडीने शिक्षक भरती प्रक्रिया राबवून किंवा पेसा अंतर्गत तात्पुरती शिक्षक भरती प्रक्रिया राबवून मूळ ठाणे जिल्ह्यातील शिक्षकाना ठाणे जिल्ह्यात आणण्यासाठी मुद्दा उपस्थित करताच उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री ठाणे जिल्हा श्री.एकनाथ शिंदे साहेब यांनी राज्याचे मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक यांना पालघर व ठाणे जिल्ह्याचे जिल्ह ाधिक ारी, जिल्ह ा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,शिक्षणाधिकारी व ग्रामविकास प्रधान सचिव यांच्यासमवेत बैठक आयोजित करून तातडीने मूळ ठाणे जिल्ह्यातील शिक्षक यांना ठाणे जिल्ह्यात आणण्यासाठी कार्यवाही करावी अशा सूचना दिल्या त्यामुळे विकल्प विपरीत मूळ ठाणे जिल्ह्यातील शिक्षकांना आता न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे

# वनमंत्री गणेश नाईकांचा ठाण्यात 'ओन्ली कमळ' चा नारा



## जनता दरबार घेणार

**ठाणे महापालिकेची निवडणुक चार प्रभागांची होईल. भाजपच्या स्थानिक नेत्यांनी यासबंधीचे नियोजन करुन घ्या. याठिकाणचे अभियंते, शहरविकास विभागाचे अधिकारी यांच्या संपर्कात रहा. मी पालघरचा पालकमंत्री असलो तरी ठाण्यातील गडकरी रंगायतन येथेही माझा जनता दरबार भरेल, अशी घोषणा नाईक यांनी यावेळी केली. पक्षाने माझ्यावर ठाण्याची जबाबदारी दिली तर माझे ऐका, तुमचे आयुष्य सुरळीत व्हावे यासाठी मी जीवाचे रान करेन**

**- गणेश नाईक, वनमंत्री**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : देशात एक काळ असा होता की जेव्हा 'ओन्ली विमल' ही जाहीरात सर्वत्र गाजत होती. आता देशात 'ओन्ली कमळ' हा एकमेव नारा सर्वत्र घूमत आहे. ठाणे शहरात भविष्यकाळात सुशासन हवे असेल, तुम्हाला २४ तास पाणी हवे असेल तर ठाण्यातही 'ओन्ली कमळ' हा नारा घुमायला हवा. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पक्षाने जर मला ठाण्याची जबाबदारी दिली तर ठाण्यात माझे ऐका. तुमच्या जगणे सुरळीत करण्याचा मी तुम्हाला शब्द देतो, अशा शब्दात वनमंत्री गणेश नाईक यांनी मंगळवारी सायंकाळी ठाणे महापालिका निवडणुकांचे रणशिंग फुंकले.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कोपरी-पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघाचा एक भाग असलेल्या कोपरी परिसरात भाजपचे माजी नगरसेवक भरत चव्हाण यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात नाईक उपस्थित होते. यावेळी कोपरी मंडळ भाजपच्या वतीने नाईक यांचा जाहीर सत्कारही करण्यात आला. यावेळी बोलताना नाईक यांनी 'ठाणेकरांचे जगणे सुसह्य करायचे असेल तर आता 'ओन्ली कमळ' हाच ध्यास ठेवायला हवा' असे आवाहन त्यांनी केले. ही केवळ माझी भावना नाही, तर ठाण्याचे आमदार संजय केळकर, विधान परिषदेचे आमदार निरंजन डावखरे यांचीही ही भावना आहे. जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनाही तसेच वाटत असेल. त्यामुळे ठाण्यात जर सुशासन हवे असेल तर ओन्ली कमळ ही भावना लोकांमध्ये रुजू द्या, असे आवाहन नाईक यांनी यावेळी केले. ठाणेकरांच्या हितासाठी झोकून काम करताना इतर कोणाचाही उल्लेख, टिका करायची गरज नाही, अशी टोलेबाजीही नाईक यांनी यावेळी केली.

### भरपूर पाणी· चांगल्या रहाणीमानासाठी भाजपला साथ द्या

गेली २५ वर्ष मी नवी मुंबईतील सत्ता एकहाती राखली. या शहराचे पहिला महापौर संजीव नाईक होते आणि आतापर्यतचे अखेरचे महापौर ठरलेले जयवंत सुतार हेदेखील आपल्या विचारांचे होते. नवी मुंबईत गणेश नाईक या नावाने निवडणुका लढलो आणि जिंकलोही. मी शिवसेनेत होतो, तेव्हा त्या शहरात ओन्ली शिवसेना, राष्ट्रवादीत गेलो तेव्हा महापालिकेत ओन्ली राष्ट्रवादी आणि येत्या काळात भाजप आणि भाजपच रहाणार असा दावा गणेश नाईक यांनी यावेळी केला. ठाणे महापालिकेच्या निवडणुकीत गणेश नाईक तुमच्या सर्वांचे नेतृत्व करत सर्वात पुढे राहील असा शब्द देतो, असे ते यावेळी म्हणाले. नवी मुंबईत मागील २० वर्ष मी घरपट्टी, पाणीपट्टी वाढू दिली नाही. ठाण्यात जर चांगली व्यवस्था हवी असेल तर मी जे सांगतो ते ऐकायला हवे. मी जे बोलतो ते करुन दाखवितो. नवी मुंबईला सर्वात स्वच्छ शहराचा पुरस्कार मिळतो. ठाणेकरांना मात्र पाण्यासाठी रात्री अपरात्री उठावे लागते. नवी मुंबईत २४ तास पाणी पुरवठा होतो. नवी मुंबईत शिक्षण मोफत आहे, उत्तम दळणवळणाची व्यवस्था आहे. ठाण्यातील चित्र बदलावे आणि सुशासन यावे असे तुम्हाला वाटत नाही का, असा सवाल नाईक यांनी यावेळी केला.

# महाकुंभमेळ्यात चेंगराचेंगरी

## ३० भाविकांचा मृत्यू ; ९० जण जखमी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथील महाकुंभमेळयात झालेल्या चेंगराचेंगरीत 30 जणांचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती या भव्य धार्मिक मेळाव्याच्या सुरक्षेची देखरेख करणाऱ्या पोलिस प्रमुखांनी आज प्रसारमाध्यमांना दिली. मृतांमधील 25 जणांची ओळख पटली, इतर 5 जणांची ओळख पटवण्याचा प्रयत्न सुरु आहे. तसंच 90 जण जखमी असून अनेकांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती पोलीस अधिकारी वैभव कृष्णा यांनी दिली आहे. चेंगराचेंगरी झाल्यानंतर स्थानिक रिपोर्ट आणि प्रयागराजमधील नागरिकांकडून मृतांच्या आकड्यासंदर्भात वेगवेगळे दावे केले जात होते. यामुळे सोशल मीडियावर चर्चेला उधाण आलं होतं. यानंतर अखेर प्रशासनाने अधिकृतपणे मृतांचा आकडा जाहीर केला आहे. महाकुंभमेळा प्रशासनाचे डीआयजी वैभव कृष्णा म्हणाले की, काही भाविक बॅरिकेड्स तोडून पुढे जाण्याच्या प्रयत्नात होते. यावेळी काही भाविक झोपलेले होते जे चिरडले गेले. डीआयजी म्हणाले की तिथे कोणताही व्हीआयपी प्रोटोकॉल नव्हता. जखमींच्या माहितीसाठी 1920 हा हेल्पलाइन क्रमांक जारी करण्यात आला आहे. प्रयागराज महाकुंभमेळयात झालेल्या चेंगराचेंगरीत 90 जण जखमी झाले होते, त्यापैकी 30 जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांपैकी 25 जणांची ओळख पटली आहे अशी माहिती मेळा प्रशासनाने पत्रकार परिषदेत अधिकाऱ्यांनी दिली आहे.




# ठाणे महापालिका हद्दीत ८१ शाळा अनधिकृत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे महापालिका क्षेत्रात बेकायदा सुरू असलेल्या ८१ शाळांची यादी पालिकेच्या शिक्षण विभागाने जाहीर केली आहे. यात एक मराठी, दोन हिंदी तर, ७८ इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, दिवा परिसरात सर्वाधिक म्हणजे ५५ शाळा बेकायदा सुरू असल्याची बाब यादीतून समोर आली आहे. या शाळा तात्काळ बंद केल्या नाहीतर प्रशासकीय तसेच फौजदारी कारवाई सुरू केलेली आहे. ठाणे महापालिकेची लोकसंख्या २५ लाखांच्या घरात गेली आहे. वाढत्या नागरिकरणाबरोबरच शहरात बेकायदा शाळा सुरू करण्याचे प्रकार गेल्या काही वर्षात सुरू झाले आहेत. अशा बेकायदा शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेश घेऊन त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये यासाठी पालिका प्रशासन गेल्या काही वर्षांपासून बेकायदा शाळांची यादी जाहीर करत आहे. यंदाही पालिकेने शहरातील बेकायदा शाळांची यादी जाहीर केली असून त्यानुसार संपुर्ण पालिका क्षेत्रात ८१ शाळा बेकायदा सुरू असल्याचे उघड झाले आहे.दिवा परिसरात ५५ बेकायदा शाळा असल्याचे समोर आले,या शाळा तात्काळ बंद करण्याचा आदेश. नाहीतर प्रशासकीय तसेच फौजदारी कारवाई सुरू केलेली आहे.

## गीतासार



नासतो विद्यते भावो
नाभावो विद्यते सतः ।
उभयोरपि
दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः
॥२- १६॥

असत् वस्तूला अस्तित्व नाही आणि सत् वस्तूचा अभाव नसतो. अशा रीतीने या दोहोंचेही सत्य स्वरूप तत्त्वज्ञानी पुरुषांनी पाहिले आहे. ॥ २-१६ ॥

अविनाशि तु तद्विद्धि
येन सर्वमिदं ततम् ।
विनाशमव्ययस्यास्य न
कश्चित्कर्तुमर्हति ॥२- १७॥

ज्याने हे सर्व जग-दिसणाऱ्या सर्व वस्तू-व्यापल्या आहेत, त्याचा नाश नाही, हे तू लक्षात ठेव. त्या अविनाशीचा नाश कोणीही करू शकत नाही. ॥ २-१७ ॥

अन्तवन्त इमे देहा
नित्यस्योक्ताः शरीरिणः ।
अनाशिनोऽप्रमेयस्य
तस्माद्युध्यस्व भारत
॥२- १८॥

या नाशरहित, मोजता न येणाऱ्या, नित्यस्वरूप जीवात्म्यांची ही शरीरे नाशिवंत आहेत, असे म्हटले गेले आहे. म्हणून हे भरतवंशी अर्जुना, तू युद्ध कर. ॥ २-१८ ॥

### आरोग्य टिप्स

## रिकाम्या पोटी कडुलिंबाची पाने खाण्याचे फायदे




१. पचन सुधारते: कडुलिंबाची पाने पचन सुधारण्यास मदत करतात. त्यामध्ये असलेले अँटीबॅक्टेरियल गुणधर्म आतड्यांमध्ये बॅक्टेरियाचा संसर्ग रोखतात आणि पचनसंस्था निरोगी ठेवतात.

२. रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करा: कडुलिंबाची पाने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करतात. त्यामध्ये असलेले काही घटक इन्सुलिन संवेदनशीलता वाढवतात, ज्यामुळे शरीर ग्लुकोज चांगल्या प्रकारे शोषू शकते.

३. त्वचेसाठी फायदेशीर: कडुलिंबाच्या पानांमध्ये दाहक-विरोधी आणि जीवाणूरोधी गुणधर्म असतात जे त्वचेसाठी फायदेशीर असतात. हे मुरुमे, डाग, मुरुमे आणि त्वचेशी संबंधित इतर समस्यांपासून मुक्त होण्यास मदत करू शकतात.

४. रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करा: कडुलिंबाची पाने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करतात. त्यामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात, ज्यामुळे शरीर विविध आजारांशी लढण्यास सक्षम होते.

५. दात आणि हिरड्यांसाठी फायदेशीर: कडुलिंबाची पाने दात आणि हिरड्यांसाठी देखील फायदेशीर आहेत.




सत्य व अहिंसेवर आयुष्यभर प्रेम करणारे महात्मा गांधी जगप्रसिद्ध आहेत .या दोन तत्त्वांवर राजकारण , समाजकारण आणि अर्थकारण यांचे संघटन करता येतं आणि असं संघटन अधिक न्याय्यअसतं असं प्रतिपादन महात्माजींनी केलं . भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या काळात लक्षावधी भारतीयांना शांततापूर्ण संघर्षाची प्रेरणा महात्मा गांधींच्या विचार व नेतृत्वामुळे मिळाली. स्वातंत्र्योत्तर काळातही त्यांचा ठसा कायम राहिला आपल्या देशातील अन्याय व विषमता नष्ट करण्यासाठी मोहनदास करमचंद गांधी हयातभर लढले .त्यांचा जन्म 2 ऑक्टोबर 1869 रोजी काठेवाडातील पोरबंदर येथे झाला .त्यांचे वडील पोरबंदर संस्थानचे दिवाण होते .आणि आई पुतळाबेन अतिशय धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या . वयाच्या 13 व्या वर्षी त्यांचा विवाह कस्तुरबांशी झाला .

शालेय शिक्षण घेतल्यानंतर 1891 साली गांधीजींनी इंग्लंडमधून बॅरिस्टरची पदवी संपादन केली . 1893 साली वकिलीच्या कामानिमित ते दक्षिण आफ्रिका येथे गेले. तेथील वास्तव्यात वर्णभेदाविरुद्ध त्यांनी तिथल्या भारतीयांना संघटित करून सरकारी छळाला न जुमानता अहिंसक मार्गाने लढा उभारला. त्यामुळे भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभर त्यांची कीर्ती पसरली . 1915 मध्ये भारतात परत आल्यावर त्यांनी पूर्ण वेळ सामाजिक कार्याला वाहून घेतले .

1920 साली टिळकयुग संपले . नंतर स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व गांधींजींकडे आले आणि गांधी युगाला सुरुवात झाली . 1921 चे असहकारितेच आंदोलन , 1930चा मिठाचा सत्याग्रह आणि 1942 चे 'चलेजाव आंदोलन ' हे विशेषतः गांधीजींच्या चळवळीचे मुख्य टप्पे होत .मिरवणुका ,मोर्चे , निदर्शने ,असहकार आणि प्रत्यक्ष कायदेभंग अशा मार्गांनी महात्मा गांधींचे लढे विकसित झाले. या लढ्यांबरोबरच स्वदेशी , खादी ग्रामोद्योगाचा विस्तार 'मूलभूत शिक्षण ,अस्पृश्यता निवारण इत्यादी मार्गाने जनशक्तीचा विधायक विनियोग करण्यावरही गांधीजींचा कटाक्ष होता. समाज जीवन अधिकाधिक निकोप व्हावं आणि चळवळ फक्त ब्रिटिशांविरुद्धच्या लढ्यापूर ती मर्यादित राहू नये म्हणून गांधीजी प्रयत्नशील होते कारण समाजाची रचना व्यक्ति व्यक्ती मधील संबंध आणि आर्थिक व्यवहार या सर्वांचं पुनर्गठन त्यांना अभिप्रेत होतं . या कार्यासाठी कार्यकर्त्यांची मनोभूमिका तयार व्हावी आणि आदर्श सामुदायिक जीवनाचा वस्तू पाठ उभारावा म्हणून त्यांनी आश्रम पद्धतीचा अंगीकार केला . दक्षिण आफ्रिकेत असतानाच टॉलस्टॉय या रशियन विचारवंतांच्या विचारांनी प्रभावित होऊन महात्माजींनी प्रथम फिनिक्स आश्रम व नंतर टॉलस्टॉय फार्म स्थापन केला .भारतात परतल्यानंतर अहमदाबादला त्यांनी आश्रम स्थापन केला . पुढे वर्धा जिल्ह्यात सेवाश्रम आश्रमाची स्थापना झाली . आपल्या पन्नास वर्षांच्या सार्वजनिक जीवनामध्ये महात्माजींनी ' इंडियन ओपिनियन ' , 'यंग इंडिया ' , 'नवजीवन ' , 'हरिजन' या नियतकालिकांचे संपादन केलं आणि त्यामध्ये विपुल लेखनही केलं. महात्माजी अहिंसेचे पुजारी होते .त्यामुळे क्रांतिकारकांशी त्यांचे नेहमीच मतभेद राहिले . असे निदर्शनास येते .

गांधीजींनी ' हिंद स्वराज ' नावाचे पुस्तक लिहिले त्यात त्यांनी भांडवलशाही व यंत्र प्रधान उद्योगसंस्कृतीचा हिरिरीने प्रतिवाद केला आहे . तत्वतः संपतीची खाजगी मालकी त्यांना अमान्य होती. म्हणून संपत्तीधारकांनी विश्वस्त वृतीने संपत्तीचा विनियोग करावा अस ते म्हणत . अर्थात गरजा कमी करून साधं जीवन जगाव असा विचार त्यांनी मांडला . गांधीजींनी त्यासंदर्भात श्रम, अस्तेय व असंग्रह ही तीन तत्वे सांगितली आहेत . श्रमाविना (कष्ट केल्याशिवाय ) संपती कोणालाही मिळू नये, दुसऱ्याचे वैध हक्क डावलून कोणाला संपतीचा उपभोग घेता येऊ नये आणि श्रीमंत व गरीब अशी विभागणी होईल, अशाप्रकारे संपतीचा संचय केला जाऊ नये , या व्यापक सुत्रांच्या आधारे अर्थव्यवहाराचे नियमन करण्यासाठी ते सांगतात .

उचललेस तू मीठ मुठभर साम्राज्याचा खचला पाया । ' अशी एका कवीने महात्मा गांधींविषयी रचना केली आहे . मिठाचा कायदा मोडण्यासाठी त्यांनी दांडी यात्रा काढली होती . विनोबाजी यांचे सह 78 सत्याग्रहींनी त्यात भाग घेतला होता .त्याचप्रमाणे महात्मा गांधींची 1942 सालची चलेजाव चळवळ म्हणजे ब्रिटिशांना दिलेला हादराच ! भारत छोडो चळवळीत भारतातील तमाम लोक महात्मा गांधींबरोबर होते . 'करेंगे या मरेंगे 'असा संदेश त्यांनी दिला . दीडशे वर्षे पार तंत्रांच्या श्रृंखलांनी जखडलेल्या भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ते अनेक वेळा तुरुंगात गेले . त्यांचे कार्य पाहून स्वातंत्र्यासाठी सारी जनता त्यांच्यामागे उभी राहिली . "भारत छोडो "असे इंग्रजांना त्यांनी ठणकावून सांगितले . भारतीय जनता जागृत झाली होती .इंग्रजांनी लाठीमार व गोळीबार केला . अनेकांना तुरुंगात घातले .पण इंग्रजांचे काही चालले नाही . शेवटी 15 ऑगस्ट 1947 रोजी देश स्वतंत्र झाला . दुर्दैवाने देशाची अयोग्य रित्या फाळणी झाली . परिणामी राष्ट्रपिता ,निष्काम कर्मयोगी व महात्माजी यांना 30 जानेवारी 1948 रोजी प्रार्थनेच्या वेळी दिल्ली येथे हुतात्म्याचे मरण आले. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात ज्यांनी आपल्या प्राणांच्या आहुत्या दिल्या , त्यांच्या अलौकिक त्यागाबद्दल 30 जानेवारी हा 'कृतज्ञता दिवस ' किंवा 'हुतात्मा दिन 'म्हणून साजरा केला जातो .भारतीय स्वातंत्र्याचे जनक म्हणून राजकारणात अभूतपूर्व क्रांती करणाऱ्या सहस्त्रकातील कर्तबगार आणि प्रभावशाली महामानवास ही श्रद्धांजली !

शब्दपुष्पांजली !! आदरांजली !!!



डॉ. आनंदराव सूर्यवंशी

## केडीएमसीतर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवडयाची सांगता




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मराठी भाषा संवर्धनासाठी राज्य शासनाच्या निर्देशानुसार व कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या निर्देशानुसार मराठी भाषा संवर्धन पंधरवडयाचा सांगता सोहळा दि.२८ जानेवारी रोजी कल्याण पश्चिम येथील सिटी पार्क येथे उत्साहात संपन्न झाला. यावेळी महापालिकेने अधिकारी व कर्मचारी वर्गासाठी मराठी गीत गायन स्पर्धा, मराठी हस्ताक्षर स्पर्धा, चारोळी स्पर्धा आणि महापालिकेच्या शालेय विदयार्थ्यांसाठी मराठी निबंध स्पर्धा, म्हणी, वाकप्रचार स्पर्धा इतर महापालिका क्षेत्रातील महाविदयालयातील विदयार्थ्यांनी पेहराव मराठी भाषा स्पर्धा, लावणी स्पर्धा इत्यादी स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर मराठी भाषेचे वैभव जपणे, मराठी भाषेचे संवर्धन करणे, मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर करणे आवश्यक असून त्यादृष्टीने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या विविध कार्यक्रमांमध्ये बिर्ला महाविद्यालयातील विदयार्थ्यांनी एक झाड एक कविता, पथनाटय, सोनावणे महाविद्यालयातील विदयार्थ्यांनी अक्षर दिंडी, मंगळागौर, प्रगती महाविद्यालयातील विदयार्थ्यांनी शिवचरित्र असे बहारदार कार्यक्रम सादर केले.

हा कार्यक्रम बिर्ला महाविद्यालयाचे संचालक डॉ. नरेश चंद्र, उपआयुक्त प्रसाद बोरकर, संजय जाधव व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, विदयार्थी, पालक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महापालिका सचिव तथा मराठी भाषा अधिकारी किशोर शेळके यांनी केले.

## दुग्ध व्यवसायाच्या विकासासाठी उपाययोजना कराव्यात

### - मंत्री अतुल सावे

मुंबई : दूध व्यवसाय हा भारतीय कृषी क्षेत्राचा एक महत्त्वाचा घटक आहे. दूध व्यवसायाच्या संकलन, प्रक्रिया व विक्री या तीन महत्त्वाच्या क्रिया आहेत. त्यापैकी दूध संकलन केंद्र ही पहिली पायरी असून, दूध प्रक्रिया क्रेंद्र व दूध उत्पादक यांच्यातील दुवा ठरते. यातून बेरोजगार युवकांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. दूध योजना केंद्रचालक यांच्या मागण्यांबाबत तसेच व्यवसायाच्या विकासासाठी उपाययोजना कराव्यात, असे दुग्ध व्यवसाय विकास मंत्री अतुल सावे यांनी निर्देश दिले.

मंत्रालयात मंत्री श्री. सावे यांच्या अध्यक्षतेखाली बृहन्मुंबई दूध योजना केंद्रचालक वेल्फेअर असोसिएशन व महाराष्ट्र दूध वितरक सेना यांच्या मागण्यांबाबत बैठक घेण्यात आली. त्यावेळी मंत्री श्री.सावे बोलत होते.

मंत्री श्री.सावे म्हणाले,की दूध व्यवसायाच्या विस्ताराने ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळते. त्यामुळे या क्षेत्राचा विकास महत्त्वाचा आहे. दूध व्यवसायाच्या सशक्तीकरणासाठी आणि त्यात काम करणाऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा मिळवून देण्यासाठी शासन कटीबद्ध आहे.

या बैठकीत दूध वितरक, केंद्रचालक व राज्यातील दुग्धशाळांमधील कर्मचाऱ्यांच्या समस्यांसंदर्भातही चर्चा करण्यात आली. या समस्या निराकरणासाठी योग्य उपाययोजना कराव्यात, असेही मंत्री श्री. सावे यांनी सांगितले.

या बैठकीस दुग्ध व्यवसाय विकास विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## कल्याण पूर्वेतील बेकायदा जीन्स कारखाने जमीनदोस्त

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वेतील आय प्रभागातील चिंचपाडा भागातील २२ जीन्सचे कारखाने आय प्रभागाचे साहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी पोलीस बंदोबस्तात पालिका तोडकाम पथकाच्या साहाय्याने मंगळवारी जमीनदोस्त केले. यावेळी काही स्थानिक मंडळी या कारवाई विषयी नाराजी व्यक्त करण्यासाठी आली होती, पण त्यांना दाद न देता पालिका पथकाने हे सर्व कारखाने जेसीबीच्या साहाय्याने भुईसपाट केले. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे उल्हासनगरमधील जीन्स कारखाने शहरातून पंधरा वर्षापूर्वी हटविण्यात आले. या कारखान्यांमुळे शहरात वायू, जलप्रदूषण होत असल्याच्या वाढत्या तक्रारी होत्या. नागरी वस्तीत हे कारखाने सुरू करण्यास प्रतिबंध आहे. काही जीन्स कारखाना चालक कल्याण पूर्वेतील चिंचपाडा, आशेळे,



माणेरे परिसरातील काही स्थानिक जमीन मालकांना हाताशी धरून हे कारखाने सुरू करत आहेत.

यापूर्वीही या भागातील सुमारे ४० हून अधिक जीन्स कारखाने आय प्रभागाच्या तत्कालीन साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी भुईसपाट केले होते. हे कारखाने मालकांनी पुन्हा चोरून लपून उभे केले होते. हे कारखाने कोणाला दिसू नयेत म्हणुन या कारखान्यांवर ताडपत्री, गोणपाटे टाकण्यात आली होती. या कारखान्यांच्या ध्वनी, वायु प्रदूषणाचा त्रास होत असल्याच्या तक्रारी चिंचपाडा भागातील रहिवाशांनी आमदार सुलभा गायकवाड यांच्याकडे केल्या होत्या. आमदार गायकवाड यांनी यासंदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कल्याण येथील अधिकाऱ्यांना सूचित केले होते. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी या कारवाईसाठी कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाला सूचित केले होते.

आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी आय प्रभागाचे साहाय्यक आयुक्त भारत पवार यांना चिंचपाडा भागातील जीन्सचे कारखाने जमीनदोस्त करण्याचे आदेश दिले होते. मंगळवारी दुपारी साहाय्यक आयुक्त पवार पालिकेचे तोडकाम पथक घेऊन पोलीस बंदोबस्तात चिंचपाडा येथे पोहचले. तेथील २२ जीन्सचे कारखाने, त्यांची यंत्र जेसीबाच्या साहाय्याने जमीनदोस्त केली. ही कारवाई सुरू असताना काही तथाकथित पुढारी जीन्स कारखाने मालकांचा कैवार घेऊन पुढे आले होते. पण पवार यांनी त्यांची समजूत काढली. पुढे कारवाई सुरूच ठेवली. स्थानिक जमीन मालक जीन्स कारखान्यांना भाड्यासाठी जमिनी देत असल्याने कल्याण पूर्वेत बेकायदा जीन्स कारखान्यांचा विषय संपत नसल्याचे स्थानिकांनी सांगितले.

## मुरबाडमध्ये रस्ता सुरक्षा सप्ताहातर्फे बाईक रॅली

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अनुषंगाने महामार्ग पोलीस महाराष्ट्र, ठाणे परिक्षेत्र ,ठाणे विभाग ,पोलीस मदत केंद्र माळशेज, मुरबाड पोलीस स्टेशन,टोकावडे पोलीस स्टेशन, विधी समिती मुरबाड विभाग व उपप्रादेशिक विभाग कल्याण यांच्या वतीने शिवळे ते मुरबाड बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीचे उद्घाटन प्रसंगी वाहतुकी बाबत .सचिन शिरसाठ , अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती,मुरबाड यांनी मार्गदर्शन केले. सदर वेळी महामार्ग डी वाय एस पी कल्पना गाडेकर, महामार्ग पोलीस निरीक्षक संतोष खानविलकर, महामार्ग पोलीस मदत केंद्र माळशेज प्रभारी अधिकारी अनिल विसपुते, आरटीओ अधिकारी अहिरे,प्रभारी अधिकारी टोकावडे पोलीस स्टेशन . दिनकर चकोर, प्राचार्य मधुकर बडगुजर , महेश बांगर, सरपंच जाधव यांच्या हस्ते रॅलीचे उद्घाटन समर्थ हॉटेल शिवळे येथे करण्यात आले.

मुरबाड एमआयडीसी हॉल येथे कार्यक्रमात रस्ता सुरक्षितेचे नियम पाळले तर आपण व आपले कुटुंब सुरक्षित राहू असे मार्गदर्शन महामार्ग डी वाय



एस पी ठाणे विभाग सौ.कल्पना गाडेकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषण मार्गदर्शनामध्ये म्हटले. सदर वेळी मुरबाड तशिलदार अभिजीत देशमुख , नायब तहसीलदार अमोल शिंदे,मुरबाड, आरटीओ अधिकारी अहिरे, प्राचार्य मधुकर बडगुजर, मुरबाड पोलीस विभागीय अधिकारी जगन्नाथ शिंदे, महामार्ग पोलीस निरीक्षक पोलीस निरीक्षक संतोष खानविलकर, यांनी देखील वाहतूक नियमाबाबत जनतेला मार्गदर्शन केले.

वैभव मंडलिक, दर्शन वाकचौरे व त्यांच्या टीमने ईशस्तवन व गाणी गायली. कार्यक्रम यशस्वी करण्याकरता समाजसेवक केलास मनोरे, भाई शेटे, आजीबाई शाळेचे प्रणेते व इतिहास अभ्यासक योगेंद्र बांगर, चिराग पष्टे ,महेश बांगर समर्थ हॉटेल .रोठे,जय मनोरे व टीम टेन मुरबाड यांनी केले.

अनिल विसपुते प्रभारी अधिकारी पोलीस मदत केंद्र माळशेज यांनी लोकांना वाहतुकी बाबत शपथ देऊन प्रास्ताविक केले. पोलीस हवालदार संजय घुडे यांनी गायलेले 'जीवन अनमोल है भैया' हे गीत पडद्यावर दाखवण्यात आले. जो चुकला नियमाला तो मुकला जीवाला अशा स्वरूपाची रांगोळी नंदकुमार शिंदे यांनी काढली आहे. सदर ठिकाणी इन्फो केअर हॉस्पिटलचे रोहित झुंजारराव यांनी मित्र तपासणी,तर शिवनेरी हॉस्पिटलचे करण जाधव यांनी ईसीजी वगैरे शारीरिक तपासणी ठेवली होती. तसेच शुभम व्यापारी यांनी कोलेस्ट्रॉल व इतर तपासणी देखील लोकांना फ्री ऑफ करून दिली. चांगली कामगिरी केली म्हणून मृत्युंजय दूत व पोलीस अंमलदार, तसेच लाख मोलाचे जीवन या जनजागृती वाहतूक नियमांच्या गाण्यांमध्ये सहभागी, संगीत व्हिडिओग्राफी व कलाकार यांचा सत्कार करण्यात आला.बनाची वाडी येथील आदिवासी बांधवांनी आपले आदिवासी नृत्य सादर करून लोकांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवव्याख्याता नंदकुमार शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन संजय घुडे यांनी केले.

## अनधिकृत इमारत प्रकरणी विकासकावर गुन्हा दाखल



कल्याण : कल्याणमधील कुख्यात बिल्डर सलमान डोलारे यांचा अजून एक कारनामा समोर आला आहे. ९ मजली इमारत आणि एका भला मोठा बंगल्याचे अनधिकृत बांधकाम केले आहे. इमारतीमधील सर्व सदनिका आणि वाणिज्य गाळे विकून टाकल्या आहेत. यूसूफ हाईटसनंतर कल्याणमधील जे.एम. टॉवर आणि जमजम व्हीला बंगला अनधिकृत घोषित झाल्याने रहिवासी हवालदील झाले आहे. आत्ता या इमारतीवर लवकर कारवाईचा हातोडा चालविणार जाणार असल्याची माहिती केडीएमसीचे उपायुक्त अवधूत तावडे यांनी दिली आहे. धक्कादायक म्हणजे विकासक डोलारे याच्या विरोधात गुन्हे दाखल होऊनही त्याला पोलिस शोधू शकलेले नाहीत.

महापालिकेच्या आरक्षित भूखंडावर बिल्डर डोलारे याने यूसूफ हाईट्स ही इमारत उभी केली. या प्रकरणी बिल्डरच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर याच बिल्डरने अन्सारी चौकात जे. एम. टॉवर या तळ अधिक ९ मजली इमारतीत वाढीव बांधकाम केले आहे. वाढीव बांधकामाची महापालिकेच्या नगररचना विभागाकडून परवानगी घेण्यात आलेली नाही. याच टॉवर शेजारी १२ मीटर रुंद विकास योजनेच्या रस्त्यात बाधित असलेल्या जागेत जमजम व्हीला हा तळ अधित तीन मजली बंगल्याचे बांधकाम केले. या बंगल्याच्या वाढीव बांधकामाची बिल्डरने परवानगी घेतली नाही. या प्रकरणी बिल्डरला महापालिकेने नोटिस बजावून सुनावणीकरीता बोलावले होते.

वाढीव बांधकाम करण्यासाठी महापालिकेची परवानगी घेतली नाही. जे. एम. पावर मधील वाढीव बांधकामाची परवानगी तसेच जमजम बंगल्याच्या अधिकृततेविषयी कोणती कागदपत्रे बिल्डरने सादर केली नाही. त्यामुळे संबंधित बांधकाम महापालिकेने अनधिकृत असल्याचे घोषित केले. हे अनधिकृत बांधकाम बिल्डरने स्वत:हून पाडावे अशी नोटिस ही महापालिकेने बिल्डरला बजावली. या नोटिसलाही बिल्डरने प्रतिसाद दिलेला नाही. अखेरीस महापालिकेच्या क प्रभागाचे अधीक्षक उमेश यमगर यांनी बिल्डरच्या विरोधात एमआरटीपी ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी महापालिकेच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे उपायुक्त अवधूत तावडे यांनी सांगितले की, संबंधितल बिल्डरच्या विरोधात एमआरटीपी अ'क्टनुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांची मदत घेऊन इमारत पाडकामाची पुढील कारवाई केली जाईल.

## जलसंवर्धनात जीवनदीप महाविद्यालयाचा पुढाकार




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली : जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई संचालित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली . भूगोल विभाग व ग्रीन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून उल्हास नदीचे जलसंवर्धनाच्या संदर्भात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उल्हास नदीला दि.25/01/2025 प्रत्यक्ष भेट देऊन जलपर्णी संदर्भात संशोधनात्मक दृष्टीने प्राध्यापकांच्या साह्याने जलपर्णी अभियान सर्वे राबविला आहे . जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष श्री. रविंद्र घोडविंदे सर यांच्या संकल्पनेतून उल्हास नदी जलपर्णी प्रदूषणा संदर्भात महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थी यांना पुढील कामाची रूपरेषा ठरवून संशोधन करण्याचे काम हाती दिले आहे. या उपक्रमात संस्थेचे संचालक प्रशांत घोडविंदे सर, डॉ. प्राचार्य के बी कोरे सर, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे सर यांनी मोलाचे मार्गदर्शन करून व भूगोल व इतर विभागती प्रा. डॉ. विजय हेरोडे सर , प्रा. राजू धसाडे सर , प्रा. प्रवीण भालेराव सर यांनी स्वतः उल्हास नदीचे सर्वेक्षण करून विद्यार्थ्यांना जलपर्णीचे फायदे व तोटे तसेच तिची कशी विल्हेवाट लावावी या संदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले.

दैनिक जीवनदीप वार्ता




# मुंबई गोवा महामार्ग चौपदरीकरणात कंपन्यांनी थकविला कोट्यवधींचा कर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

रत्नागिरी : कोकणातून जाणाऱ्या मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम करणाऱ्या चार कंपन्यांना शासनाचा साडे नऊ कोटी कर थकविल्याचे उघडकीस आले आहे. गौण खनिज उत्खननाचा कर (रॉयल्टी) न भरल्याने जिल्हा प्रशासनाकडून या कंपन्यांना नोटिस बजावण्यात आली आहे. या चार ही कंपन्यांना जिल्हा प्रशासनाकडून ३१ मार्चपर्यंत कर भरण्याची मुदत देण्यात आली आहे. मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम करणाऱ्या ईगल इन्फ्रा प्रा. लि., चेकत इंटरप्रायझेस, रवी इन्फ्रा, जे. एस. म्हात्रे या कंपन्यांनी सुमारे साडेनऊ कोटी एवढा कर थकविला आहे.



मुंबई गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या काम वेगाने सुरु आहे. मात्र गेली चौदा वर्षे या महामार्गाचे काम सुरू आहे. याचे सहा टप्पे करून वेगवेगळ्या कंपन्यांना त्याचा ठेका देण्यात आला होता. त्यापैकी काही कंपन्यांनी काम सोडले. मात्र दुसऱ्या कंपन्यांना हे काम देण्यात आले. डिसेंबर २०२५ हा महामार्ग पुर्ण करण्याची डेडलाईन देण्यात आली आहे. अनेक ठिकाणी चौपदरीकरण झाले आहे. काही टप्प्यातच हे काम शिल्लक असताना ठेकेदार कंपन्यांना जिल्हा प्रशासनाने दुसरा दणका दिला आहे. कंपन्यांनी केलेल्या उत्खननापैकी अनेक कंपन्यांनी गौण खनिज उत्खननाचा कर भरला नसल्याचे पुढे आले आहे. महामार्गाचे काम करताना काळ्या दगडाचे मोठ्या प्रमाणात उत्खनन झाले आहे. त्या तुलनेत कंपन्यांनी रॉयल्टी भरलेली नाही.

त्यासाठी महसुल विभागाने कोल्हापूरच्या येथील इलोक्टॉनिक टोटल स्टेशन (ईटीएस) कंपनीकडुन या उत्खननाचा सर्व्हे केला. त्यामध्ये ही बाब उघड झाली आहे. ईगल इन्फ्रा प्रा, लि (मकरंद गांधी) वांद्री (संगमेश्वर) येथे ५१ हजार ३३४ ब्रास जादा उत्खनन केले आहे. त्यामुळे त्यांना ३ कोटी ८ लाख कर भरावा लागणार आहे. चेतक इंटरप्रायझेस यांनी हडकरी (चिपळूण) येथे २ हजार ८६६ ब्रास उत्खनन केले आहे. १७ लाख कर भरावा लागणार आहे. रवी इन्फ्रा या कंपनाने वांद्री (संगमेश्वर) येथीर ५८ हजार ६४६ ब्रास उत्खनन केले असून २ कोटी ३२ लाख कर भरावा लागणार आहे. जेएस म्हात्रे कंपनीने वांद्री (संगमेश्वर) येथे ६६ हजार ९१० ब्रास काळ्या दगडाचे उत्खनन केल्यामुळे त्यांना ४ कोटी रुपये कर भरावा लागणार आहे. एकुण साडे नऊ कोटी रुपये कर या कंपन्यांकडून थकविण्यात आला आहे.

# बेस्टच्या विद्युतपुरवठा विभागात नोकर भरती

**शैक्षणिक पात्रता व अनुभव**

**माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण आणि संबंधित क्षेत्रातील प्रमाणपत्रधारक मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांचे सामान्यज्ञान व प्रभुत्व आवश्यक**

---------

**विद्युतपुरवठा विभागातील किमान तीन वर्षांचा अनुभव आवश्यक**

---------

**अर्ज करण्याची अंतिम तारीख संबंधित कागदपत्रांसह ५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत खालील पत्त्यावर अर्ज सादर करावेत उप संचालक कार्यालय, वीज विभाग, दुसरा मजला, शिवाजी नगर औद्योगिक वसाहत, मुंबई – ४०००१५**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : बेस्टच्या विद्युत विभागात मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असून रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया अखेर सुरू झाली. विद्युतपुरवठा विभागातील जोडारी सहाय्यक (जॉइंटरमेट) या पदासाठी बेस्ट उपक्रमाने कर्मचाऱ्यांकडूनच अर्ज मागवले आहेत. बेस्ट उपक्रमाच्या परिवहन विभागाची आधीच दुर्दशा झालेली असताना आता विद्युतपुरवठा विभागही चर्चेत आला आहे. बेस्टचा विद्युतपुरवठा विभाग अद्याप नफ्यात आहे. मात्र विद्युत विभागातही मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त आहेत.

छापील बिले वितरित करण्यासाठी कर्मचारी नाहीत, मीटर वाचनासाठी कर्मचारी नाहीत अशी परिस्थिती असल्यामुळे बेस्टचा विद्युतपुरवठा विभागही सध्या अडचणीत आहे. त्यातच बेस्ट उपक्रमाच्या महाव्यवस्थापक पदावर कोणीही प्रशासकीय अधिकारी येण्यास तयार नाही. त्यामुळे बेस्ट उपक्रम सध्या निर्णायकी आहे. सध्या बेस्टच्या कारभाराची तात्पुरती सूत्रे मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी यांच्याकडे सोपवली आहेत. गेल्या आठवड्यात बेस्ट कामगार सेनेने जोशी यांची भेट घेऊन बेस्ट उपक्रमाच्या अडचणीचा पाढा वाचला. यावेळी परिवहन विभागाबरोबरच विद्युतपुरवठा विभागातील समस्यावरही चर्चा करण्यात आली.

बेस्ट उपक्रमातील विविध पदे रिक्त असल्यामुळे त्याचा ग्राहक सेवेवर परिणाम होत असून विद्युतपुरवठा विभागाचेही नुकसान होत असल्याचा मुद्दा कामगार सेनेच्या सदस्यांनी मांडला. विद्युत विभागातील पदभरतीबाबत यापूर्वीच निर्णय झाला होता. मात्र त्याची अंमलबजावणी झाली नव्हती. त्यामुळे ही पदभरती लवकर सुरू करण्याचे आदेश जोशी यांनी बेस्टच्या अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार बेस्ट प्रशासनाने आता भरती प्रक्रिया सुरू केली आहे. जोडारी सहाय्यक पदासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्रमाणपत्र असलेल्या कायम स्वरूपी अंतर्गत कर्मचाऱ्यांकडून अर्ज मागवण्यात आले आहेत. अर्हता प्राप्त उमेदवारांची अंतिम मुलाखत व्यवसाय प्रकारांनुसार व योग्यतेनुसार घेण्यात येणार आहे.

# किरिट सोमय्या यांनी घेतली कल्याण तहसीलदारांची भेट



दै· ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : भाजपाचे खासदार किरीट सोमय्या यांनी आज कल्याण तहसीलदार सचिन शेजाळ यांची भेट घेतली, यामध्ये सध्या महाराष्ट्रात बांगलादेशी घुसखोर अनाधिकृत वास्तव करत असून यांना तहसील कार्यालयाकडून विविध दाखले देण्यात येत असल्याचे समोर आल्याने याच धर्तीवर ही भेट होती, तसेच याबाबत तहसीलदारांशी विचारविनिमय केल्याचे श्री सोमय्या यांनी सांगितले.विरोधकांचे अनेक घोटाळे बाहेर काढून त्यांच्या मागे ईडी, सारख्या विविध यंत्रणा मागे लावून राज्यात खळबळ उडवून देणारे भाजपाचे खासदार किरिट सोमय्या यांची मोठी पंचायत झाली ती म्हणजे, ज्या विरोधकांना त्यांनी हैराण केले तेच विरोधक भाजपाबरोबर सत्तेत सहभागी झाले, आता ब-याच कालावधी नंतर त्यांनी पुन्हा बांगलादेशी घुसखोरांचा विषय हाती घेतला, यावरून मालेगाव येथील तहसिलदार निलंबित देखील झाले होते.यामुळे ते राज्यातील प्रत्येक तहसीलदार यांना भेटी देत आहेत, याच अनुषंगाने ते आज कल्याण येथे आले होते,तहसीलदार सचिन शेजाळ यांनी भेटल्यानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले

विधानसभा निवडणुकीच्या वेळी मोठ्या प्रमाणात फंडिंग झाले, मालेगावात १९३कोटी कॅश काढण्यात आली. राज्यात सुमारे२लाखाच्या आसपास लोक कोणताही पुरावा, कागदपत्रे नसताना राहत आहेत, यामध्ये काही राजकीय पुढारी असून त्यांची चौकशी व्हायला हवी असे सांगून कल्याण तालुक्यातून १२शे ५०अर्ज आले आहेत, त्याबाबत योग्य तपासणी करावी असे आपण तहसिलदार यांना सांगितले असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय आपण उदया मालेगाव येथे जावून कारवाईची मागणी करणार असल्याचे सांगितले, परंतु याच तालुक्यातील गुरवली येथील जमीन घोटाळ्यावरुन आमदार प्रताप सरनाईक यांच्या मागे ईडी लावणारे, सोमय्या यावर चकार बोलले नाहीत, तसेच कल्याण येथील वाहतूक कोंडी, मेट्रोचे रखडली कामे, गुन्हेगारी, इत्यादी वर बोलने सोईस्कर टाळले,यावेळी त्यांच्या सोबत माझी आमदार नरेंद्र पवार हे उपस्थित होते.

# म्हाडाची मुंबई पोलिसांसाठी घरे



**राज्य सरकारच्या निर्देशानुसार म्हाडाच्या १७ अभिन्यासातील पोलीस सेवानिवासस्थानांचा पुनर्विकास करण्याचा निर्णय म्हाडाने घेतला आहे.**


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुंबईतील पोलिसांच्या सेवानिवासस्थानांची दुरवस्था झाली आहे. लहानशा घरात पोलिसांना राहावे लागत आहे. मुंबईत सेवानिवासस्थाने अपुरी पडत आहेत. एकूणच पोलिसांच्या निवाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पण आता मात्र लवकरच म्हाडा ४,७५० पोलिसांना नवीन इमारतीत ४८० ते ६५० चौरस फूट क्षेत्रफळाची घरे देणार आहे. म्हाडाच्या १७ अभिन्यासातील पोलीस सेवानिवासस्थानांचा पुनर्विकास करण्याचा निर्णय राज्य सरकारच्या निर्देशानुसार म्हाडाने घेतला आहे.

म्हाडाच्या मुंबई मंडळाने पुनर्विकास प्रकल्पाचा सविस्तर आराखडा तयार करण्यासाठी वास्तुरचनाकाराची नियुक्ती केली आहे. लवकरच आराखडा अंतिम करून प्रत्यक्ष पोलीस सेवा निवासस्थानांच्या पुनर्विकासाला सुरुवात करण्याचे मंडळाचे नियोजन आहे. मंडळाचे मुंबईत १०७ अभिन्यास आहेत. अनेक अभिन्यासातील घरे सेवानिवासस्थान म्हणून मंडळाने महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण महामंडळाला दिली आहेत. या सेवानिवासस्थांची पुरती दुरवस्था झाली असून त्यांचा पुनर्विकास करण्याची गरज आहे. त्यामुळे आता या पोलिसांच्या सेवानिवासस्थानांचा पुनर्विकास करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून याची जबाबदारी म्हाडाच्या मुंबई मंडळावर सोपविण्यात आली आहे. राज्य सरकारच्या निर्देशानुसार मंडळाने मुंबईतील १७ अभिन्यासातील ४,७५० पोलिसांच्या निवासस्थानांचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती म्हाडातील उच्चपदस्थ अधिकाऱ्याने 'लोकसत्ता'ला दिली. या १७ अभिन्यासात बिंबिसार नगर, वनराई, पंतनगर, कुर्ला, मजासवाडी, टागोरनगरसह अन्य अभिन्यासातील सेवा निवासस्थानांचा समावेश आहे. १७ अभिन्यासात ४,७५० सेवानिवासस्थाने असून यातील अंदाजे १५०० सेवानिवासस्थाने दुरवस्थेमुळे रिकामी करण्यात आली आहेत. तर उर्वरित निवासस्थानांत पोलीस राहत असले तरी त्यांची दुरवस्था झाली आहे.

४८० ते ६५० चौरस फुटांची घरे

या पुनर्विकासाअंतर्गत ४८० ते ६५० चौरस फुटांची ४,७५० घरे बांधून ती महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण मंडळाला हस्तांतरित करण्यात येणार आहेत. महत्त्वाचे म्हणजे या पुनर्विकासातून मुंबई मंडळाला अतिरिक्त घरे उपलब्ध होणार असून या घरांची विक्री सोडतीद्वारे केली जाणार आहे. ही घरे नेमकी किती असतील हे आराखडा अंतिम झाल्यानंतरच स्पष्ट होईल. एकूणच पोलिसांना मुंबईत मोठी आणि उत्तुंग इमारतीत ४,७५० सेवानिवासस्थाने उपलब्ध होणार आहेत.



**नवसाला पावणारा कल्याणचा महाराजा**

कल्याण : कल्याण पश्चिमेतील खडकपाडा, साईचौक, येथील जय शंभो नारायण मित्र मंडळाच्या नवसाला पावणारा कल्याणचा महाराजा माघी गणपती मंडळाचे यंदा १० वे वर्ष आहे. मोठ्या जल्लोषात गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. या गणारायाचे मंगळवारी मोठ्या जल्लोषात आगमन करण्यात आले.



# नवी मुंबईचे माजी उपमहापौर रमाकांत म्हात्रे यांची काँग्रेसला सोडचिठ्ठी

दै· ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : आगामी पालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईत काँग्रेस पक्षातील महत्त्वाचे पदाधिकारी पक्ष सोडून जात आहेत. नवी मुंबई महापालिकेचे माजी उपमहापौर रमाकांत म्हात्रे यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या कार्यपध्दतीवर नाराजी व्यक्त करत रमाकांत म्हात्रे यांनी पक्ष सोडला आहे. पुढील काही दिव स ांत च महाराष्ट्र युवक काँग्रेसचा उपाध्यक्ष असलेला त्यांचा मुलगा अनिकेत म्हात्रे आणि माजी महापौर असलेल्या पत्नी मंदाकिनी म्हात्रे यासुध्दा राजीनामा देण्याच्या तयारीत आहेत.

> **पक्षात सुरू असलेल्या या अनागोंदीमुळे नाराज होऊन मी राजीनामा दिला. मुलगा व पत्नीही काही दिवसांतच काँग्रेसला राजीनामा देण्याच्या तयारीत आहेत. - रमाकांत म्हात्रे, माजी उपमहापौर**

लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकीत माजी महापौर रमाकांत म्हात्रे यांचा मुलागा अनिकेत म्हात्रे ऐरोली विधानसभा निवडणुकीतून लढण्याच्या तयारीत होता. परंतु ही जागा काँग्रेसने शिवसेना उबाठा गटाला सोडली आणि एम. के मढवी यांना उमेदवारी देण्यात आली. तसेच नवी मुंबईत पक्षाचे जिल्हाध्यक्ष अनिल कौशिक यांनीही निवडणुकीच्या तोंडावर भाजपचे कमळ हाती घेतले.

रमाकांत म्हात्रे यांचे अशोक चव्हाण यांच्याशी असलेले सख्य सर्वश्रुत होते. परंतु चव्हाण यांनीही कमळ हाती घेतले त्यानंतर क ाँग्रेस म ध्ये अनेक उलटफेर प ाह ाय ल ा मिळ ाल े. दरम्यान, नवी मुंबई कॉंग्रेस जिल्ह ाध्य क्ष अरविंद नाईक यांना संपर्क केला असता संपर्क झाला नाही.

विधानसभा निवडणुकीत ऐरोली विधानसभा निवडणुक लढवण्यासाठी अनिकेत म्हात्रे यांनी तयारी केली होती. मात्र नाना पटोले यांनीच भाजपशी सलगी करुन ४ कोटींच्या बदल्यात काँग्रेसचा दावा सोडला होता.

# उरणमधील फ्लेमिंगो पक्षी पाणथळींच्या शोधात

दै· ठाणे जीवनदीप वार्ता

उरण : जैवविविधतेने नटलेल्या व पक्षी निरीक्षणाचे ठिकाण असलेल्या उरणमध्ये हजारोंच्या संख्येने परदेशी पक्षी येऊ लागले आहेत. मात्र येथील पाणथळी वर मातीचा भराव करून बुजविण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे आंतरभरती प्रवाह बंद झाल्याने उरणच्या अनेक पाणथळी कोरडया झाल्या आहेत. परिणामी अनेक पक्षी आता नव्या पाणथळींच्या शोधत आहेत. सध्या फ्लेमिंगोंनी उरण रेल्वे स्थानक आणि शेवा गावाच्या परिसरातील पाणथळींवर आपला मोर्चा वळविला आहे. उरणच्या सर्वात मोठ्या पाणजे येथील वादग्रस्त २८९ हेक्टर पाणथळ परिसरात येणारे आंतरभरती पाण्याचे प्रवाह बंद करण्यात आल्याने ही पाणथळ कोरडी झाली आहे. पर्यावरणवाद्यांनी यासंदर्भात पर्यावरण विभागाकडे तक्रार करण्यात आलेली आहे. परदेशी स्थलांतरित पक्षी येण्याचा हा काळ आहे. त्यामुळे पाणथळी कोरड्या झाल्याने पक्षी संख्या घटण्याची शक्यता आहे. नुकसानीची शहानिशा करूनही कोणतीही कारवाई झाली नसल्याबद्दल पर्यावरवादी कार्यकर्त्यांनी खेद व्यक्त केला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर जैवविविधता निर्देशांकात भारत १८० देशांपैकी १७६ व्या क्रमांकावर आहे. उरण मधील जेएनपीए बंदर परिसर पाणजे,भेंडखळ आणि बेलपाडा येथील पाणथळी कोरड्या पडू लागल्या आहेत. त्यामुळे या परिसरात येणारे पक्षी त्यांचे खाणे आणि पाणी असलेल्या नव्या ठिकाणांच्या शोधात आहेत. उरण रेल्वे स्थानक आणि नवीन शेवा गाव यांच्या मध्ये एक पाणथळ आहे. येथे फ्लेमिंगो दर्शन होत असल्याची माहिती तेलिपाडा येथील नागरिक अशोक म्हात्रे यांनी दिली आहे.

# दहिसरमधील बेवारस वाहनांचा महापालिकेकडून लिलाव

दै· ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : दहिसर परिसरात रस्त्याच्या कडेला अशाच सोडून दिलेल्या बेवारस गाड्यांचा पालिकेच्या विभाग कार्यालयातर्फे लवकरच लिलाव करण्यात येणार आहे. ५४ दोन चाकी, ३६ रिक्षा, २९ चारचाकी अशा एकूण ११९ वाहनांचा पालिकेच्या आर उत्तर विभाग कार्यालयातर्फे लिलाव करण्यात येणार आहे. या वाहनांपैकी बरीच वाहने क्रमांकविरहीत असून गुन्ह्यांमध्ये वापरलेली असू शकतात. त्यामुळे पालिका प्रशासनाने यासंदर्भातील संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करून या गाड्यांचा लिलाव करण्याचे ठरवले आहे.

मुंबईमध्ये अनधिकृत बांधकामांबरोबरच रस्त्याच्या कडेला उभ्या केलेल्या बेवारस वाहनांचा प्रश्नही मोठा आहे. अनेकदा एखाद्या गुन्ह्यात वापरलेल्या गाड्या किंवा जुन्या झालेल्या गाड्या सार्वजनिक ठिकाणी किंवा रस्त्यावर सोडून दिल्या जातात. अशा बेवारस वाहनांमुळे रस्त्यावर अतिक्रमण होतेच, पण वाहतूक कोंडीही होते. तसेच या वाहनांच्या टपावर किंवा वाहनांमध्ये पाणी साचून त्यात डेंग्यू – हिवतापाचा प्रसार करणाऱ्या डासांची उत्पत्ती होण्याची शक्यता असते. या गाड्या महिनोंमहिने एकाच जागी असल्यामुळे त्या ठिकाणचा कचराही सफाई कामगारांना काढता येत नाही.

तसेच अशा वाहनांमध्ये किंवा त्याच्या आडून आणखी गुन्हेही घडू शकतात. त्यामुळे अशी वाहने महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलने खात्याद्वारे मुंबई महापालिका अधिनियम कलम ३१४ नुसार जप्त करण्यात येतात. गेल्या काही महिन्यांत अशाच पद्धतीने जप्त केलेल्या दहिसरमधील वाहनांचा लवकरच लिलाव करण्यात येणार आहे.

याबाबत पालिकेच्या आर उत्तर विभागाचे सहाय्यक आयुक्त नयनीश वेंगुर्लेकर यांनी सांगितले की, अनेक दिवस एकाच जागी असलेल्या वाहनावर सगळयात आधी नोटीस लावली जाते. त्या नोटीशीला वाहनमालकांकडून ठराविक मुदतीत प्रतिसाद न मिळाल्यास ही बेवारस वाहने जप्त करण्यात येतील. बेवारस वाहनांचा कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून लवकरच लिलाव करण्यात येईल. जप्त करण्यात आलेल्या वाहनांपैकी काही वाहनांची नोंदणी राज्याबाहेर झालेली आहे. तसेच काहींना राष्ट्रीयीकृत बँका व सहकारी बँका यांनी अर्थसहाय्य दिलेले असू शकते. तसेच वाहन ज्याच्या नावे तारण असेल, तसेच गाडी चोरीस गेली असे समजून विमा कंपन्यांनी देयक रक्कम चुकती केली असू शकते. त्यामुळे या वाहनांबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार अथवा गहाण असे काही असल्यास त्याबाबत संबंधितांनी संपर्क करावा याकरीता आवाहनही करण्यात आले आहे. याबाबत कोणीही दावा न केल्यास या वाहनांची लिलाव प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. रस्त्याच्या कडेच्या बेवारस वाहनांची विल्हेवाट लावण्याबाबतच्या पालिका आयुक्तांच्या आदेशानुसार ही कार्यवाही केली जात असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले

# अनधिकृत बांधकामे , वसईतील हरितपट्टा होतोय नष्ट

दै· ठाणे जीवनदीप वार्ता

वसईचा परिसर हा सागरी, नागरी आणि डोंगरी अशा भागात विस्तारला गेला आहे. त्यामुळे येथील प्रत्येक परिसराची विशिष्ट अशी ओळख निर्माण झाली आहे.पश्चिमेच्या भाग विस्तीर्ण अशा समुद्र किनार पट्टीने बहरलेला तर पूर्वेचा भाग हिरव्यागार डोंगर रांगांनी बहरलेला आहे.मात्र मागील काही वर्षांपासून वसईच्या परिसराचा झपाट्याने विकास होत गेला. तर काही ठिकाणी जबरदस्तीने विकास घडवून आणला.या विकासाच्या नावाखाली मात्र चारही बाजूने वसईच्या पर्यावरणाची मात्र हानीच झाल्याचे चित्र वारंवार दिसून येत आहे. एका समस्येतून सुटका होत नाही तर दुसरी समस्या तयार अशीच काहीशी परिस्थिती शहराची झाली आहे. त्यातच आता आणखीन एक समस्या वेगाने पुढे उभी राहत आहे ती म्हणजेच सिमेंट कारखान्यातील प्रदूषणाची, मुंबई उपनगर शहराच्या शहराच्या वेशीवर असलेल्या वसईत विविध ठिकाणच्या भागात रेडीमिक्स सिमेंट कॉंक्रीट (आरएमसी) कारखाने उभे राहू लागले आहेत. मात्र प्रकल्प उभे करताना प्रदूषणाचे नियंत्रण संदर्भात कोणतेच नियम पाळले जात नसल्याने या सिमेंट कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या प्रदूषणाचे प्रमाण वाढू लागले.मुंबई, ठाणे, पालघर, वसई विरार, मिराभाईंदर अशा भागात इमारतींची बांधकामे वेगाने सुरू आहेत. याशिवाय काही ठिकाणी विविध प्रकारचे विकास प्रकल्प सुरू आहेत. त्यामुळे रेडिमिक्स सिमेंट कॉंक्रिटिकरणाची मागणी वाढू लागली आहे. या वाढत्या मागणीमुळे आता प्रकल्पांची संख्या ही वाढत आहे.

यापूर्वी केवळ एक ते दोन प्रकल्प शहरात होते. आता त्याच प्रकल्पांची संख्या चाळीसहून अधिक झाली आहे.यातील बहुतांश प्रकल्प हे अगदी रहदारी असलेल्या मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाला, नागरिक वस्ती असलेल्या परिसराला लागून आहेत. या प्रकल्पातून बाहेर पडणाऱ्या धुळीच्या भुकटीने प्रकल्प असलेल्या आजूबाजूच्या परिसराची अक्षरशः धूळधाण केली आहे. प्रकल्प उभारणी करताना प्रदूषण नियंत्रण मंडळाने नागरिक वस्ती पासून लांब प्रकल्प असणे, मुख्य रस्त्यापासून पाचशे मीटरची मर्यादा, प्रकल्पाच्या चोहोबाजूंनी आच्छादन अशी मार्गदर्शक तत्वे लागू केली आहेत. मात्र बहुतांश भागात या मार्गदर्शक तत्त्वांचा विसर पडला असल्याने आता प्रकल्पाचे विपरीत परिणाम दिसू लागले आहे. केवळ प्रकल्पामुळेच नाही तर त्याच्या नियमबाह्य पद्धतीने केल्या जाणाऱ्या वाहतुकीमुळे प्रदूषण वाढीस लागत आहे. काही ठिकाणी दिवस रात्र असे प्रकल्प सुरू असतात. त्यामुळे नागरिकांच्या निवांत झोपेची ही पूर्णतः वाट लागते. या सीमेंटच्या धुळीमुळे नागरी आरोग्यावर ही मोठा परिणाम जाणवत आहे. या भागातून प्रवास करताना नागरिकांना श्वास घेण्यास ही अडचणी येत आहेत. यातून श्वसन विकाराचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.अशा प्रदूषणकारी प्रकल्पांवर कारवाई करण्याकडे महापालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळ अशा शासकीय यंत्रणा पुढाकार घेत नसल्यानेच प्रदूषण करणाऱ्यांची मुजोरी अधिकच वाढली आहे.या प्रदूषणाचा परिणाम केवळ मानवी आरोग्यावरच नाही तर येथील निसर्ग सौंदर्यावर ही झाला आहे. या प्रकल्पातून सतत उडणाऱ्या धुळीने येथील निसर्गरम्य परिसराची धूळधाण होऊ लागली आहे.अनेक झाडांवर हे धूलिकण बसून हिरवी झाडे ही सीमेंट धुळीने राखाडी झाली आहेत.

# रमाबाई आंबेडकर उद्यानातील गाळ्यांना केडीएमसीचे सील

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या क प्रभागास प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार कल्याण पश्चिम येथील रमाबाई आंबेडकर उद्यान येथील दोन गाळ्यांपैकी एका गाळ्यातील साहित्य बाहेर काढून दोन्ही गाळे सील करण्याची कारवाई आज करण्यात आली. तसेच एका गाळ्यात भाजी विक्री करणाऱ्या योगेश घुगे यांच्या दुकानातील सुमारे 50 किलो प्लास्टिक पिशव्या जप्त करण्यात आल्या व त्यांच्यावर 5 हजार रुपये दंड आकारण्यात आला. मात्र, त्यांचा सर्व भाजीपाला आणि इतर सामान परत करण्यात आले आहे.

ही कारवाई कल्याण डोंबिवली महापालिकेच्या क प्रभागाचे सहा. आयुक्त धनंजय थोरात, अधीक्षक उमेश यमगर, स्वच्छता निरीक्षक जगन्नाथ वड्डे, फेरीवाला पथकप्रमुख चिंतन, देविदास आणि गणेश दळवी यांच्या मार्फत करण्यात आली. प्लास्टिक पिशव्यांविरोधात महापालिकेमार्फत कठोर कारवाई करण्यात येत असून, भाजी विक्रेते यांनी एकल प्लास्टिकचा वापर करू नये असे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात आले आहे.

# लालपरीला म्हसा यात्रा पावली !

- मुरबाड-म्हसा मुरबाड लालपरीने १० लाखाचे मिळाले उत्पन्न
- २३११३ किलोमीटर बस धावली!
- ६०००० भक्त भाविकांनी केला प्रवास!



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : ठाणे जिल्ह्यातील मुरबाड -म्हसा ऐतिहासिक यात्रा यात्रेला दिवसेंदिवस महत्व वाढत चालले आहे यात्रेत मुरबाड आगारातून दर्शनाला येणाऱ्या फक्त भाविकांसाठी लाल परी (एसटीची) चांगली व्यवस्था करण्यात आली होती या यात्रेत १२ जानेवारी ते २६ जानेवारी पर्यंत मुरबाड आगारातून मुरबाडची लाल परी २३११२ कि.मी. धावली आहे.तर जवळपास ६०००० भक्त भाविक व प्रवाशांनी प्रवास केला आहे.

त्यामुळे मुरबाड आगाराला मागच्या वर्षी पैकी एक ते दीड लाखाची घट आली आहे. यावर्षी मुरबाड आगराला मिळाले,१०दहा लाख ८९ हजार ४३५ रुपयाचे उत्पन्न मिळाले आहे तसेच २५ जानेवारी २०२५ रोजी एसटीची भाडेवाढ झाली आहे तरी सर्व प्रवाशांनी सहकार्य करावा अशी माहिती मुरबाड आगारप्रमुख योगेश मुसळे यांनी दिली आहे

# किरीट सोमय्यांनी घेतली कल्याण तहसिलदारांची भेट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण तालुक्यामध्ये तब्बल 1 हजार 250 बांग्लादेशी रोहिंग्यांनी विविध कागदपत्रांसाठी अर्ज सादर केले असल्याचे सांगत राज्यात घुसखोरीचे मोठे रॅकेट कार्यरत असून दोन राजकीय नेते आणि दोन अतिरेकी संघटनांचा त्याला पाठिंबा असल्याचा दावा भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला आहे. राज्यातील बांग्लादेशी रोहिंग्यांचा प्रश्न उचलत भाजप नेते किरीट सोमय्या यांनी आज कल्याण तहसिलदार सचिन शेजाळ यांची भेट घेतली. त्यानंतर प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना त्यांनी हा गंभीर दावा केला. यावेळी भाजप नेते किरीट सोमय्या यांच्यासोबत माजी आमदार नरेंद्र पवार हेदेखील उपस्थित होते.

2 लाख बांग्लादेशी रोहिंग्याना भारतीय बनवण्याचे कारस्थान महाराष्ट्रात रचण्यात आले आहे. साधारणपणे सहा महिन्यांपूर्वी त्याचे नियोजन करण्यात आले असून कल्याण तालुक्यात तब्बल 1 हजार 250 जणांचे अर्ज आल्याची माहिती सोमय्या यांनी यावेळी दिली. या 2 लाखांपैकी 1 लाख 23 हजार जणांना भारतात जन्म झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले असून 19 हजार जणांच्या अर्जाला मंजुरी मिळाली होती. मात्र या कट कारस्थानाचा पर्दाफाश झाल्यानंतर त्याला स्थगिती देण्यात आली आहे. तर



दोन राजकीय व्यक्तींसह अतिरेकी संघटनांचा घुसखोरीला पाठींबा - किरीट सोमय्या

ज्याप्रमाणे पासपोर्ट व्हेरिफिकेशनसाठी स्वतंत्र पोलिस अधिकारी नेमला जातो, त्याच धर्तीवर जुन्या वर्षीच्या जन्म प्रमाणपत्रांच्या व्हेरिफिकेशनसाठी अधिकाऱ्याची नेमणूक करण्याची सूचना आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवली असल्याचे सोमय्या यांनी यावेळी सांगितले.

तसेच या सर्व कारस्थानामागे मोठी गँग कार्यरत असून त्यामध्ये दोन राजकीय पुढारी, दोन अतिरेकी संघटनांचे नेते आणि दोन बांग्लादेशी एजंट या सहा जणांमार्फत नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या काळात राबवण्यात आल्याचेही सोमय्या यांनी यावेळी सांगितले. त्यासाठी मालेगाव एपीएमसीच्या नावाचा वापर करून 193 कोटी रुपये काढण्यात आले असून त्यातील 50 कोटी रुपये या घुसखोरांची कागदपत्र बनवण्यासाठी वापरण्यात आल्याची माहितीही सोमय्या यांनी यावेळी दिली.

तर या सर्व प्रकरणाची चौकशी एटीएसकडून सुरू करण्यात येत असून प्रशासकीय सहभाग आढळल्याप्रकरणी मालेगावचे दोन तहसीलदार निलंबित करण्यात आले आहेत. आणि या सर्व तहसीलदारांना सगळया अर्जांची पूनर्तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले असून या 2 लाख घुसखोरांवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# कॉ. गोविंद पानसरे हत्याप्रकरणी सहा जणांना जामीन मंजूर!

## न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत; पुरोगाम्यांचा दबाव दूर करण्यासाठी पानसरे खटला कोल्हापूर जिल्ह्याबाहेर चालवा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुंबई उच्च न्यायालयाने आज कॉम्रेड गोविंद पानसरे हत्याप्रकरणी अटकेत असलेल्या ६ जणांना जामीन दिला. या निर्णयाचे समस्त हिंदुत्वनिष्ठ संघटना मनापासून स्वागत करत आहेत. 'हिंदु दहशतवादा'ची थियरी सिद्ध करण्यासाठी पद्धतशीरपणे 'फेक नॅरेटिव्ह' निर्माण केला गेला आणि पुरोगाम्यांच्या हत्यांच्या प्रकरणांमध्ये हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्यांना अडकवण्यात आले. पानसरे कुटुंबीय, तसेच अन्य तथाकथित पुरोगाम्यांनी या प्रकरणी हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांना जामीन मिळू नये, यासाठी खूप आटापिटा केला होता. सातत्याने माध्यमांसमोर दिशाभूल करणारी भूमिका मांडून न्यायालय आणि पोलीस यांच्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न करत होते. हा खटला लांबवण्याचा प्रयत्न करत होते. या खटल्यात कोल्हापूरमध्ये पानसरे कुटुंबीय आणि पुरोगामी वापरत असलेले दबावतंत्र लक्षात घेता हा खटला यापुढेही कोल्हापूर येथे चालवला गेला, तर न्याय मिळण्यात अडचण निर्माण केली जाईल, असे आम्हाला वाटते. त्यामुळे आम्ही समस्त हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने न्यायालयाकडे विनंती करत आहोत की, पानसरे हत्या प्रकरणाचा खटला कोल्हापुरात न चालवता त्रयस्थ ठिकाणी चालवावा, अशी भूमिका सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी मांडली.

पाकिस्तानातून आलेल्या आतंकवादी अजमल कसाबला आतंकवादाच्या घटनेत वकील दिला जातो; मात्र गरीब घरातील या हिंदू मुलांना वकील मिळू न देता तुरुंगात सडवण्याचा प्रयत्न हे पुरोगामी करत होते. एकीकडे न्याय मिळावा, असा टाहो फोडणारे पानसरे कुटुंबीय 'हा खटलाच चालवू नये', यासाठी मुंबई उच्च न्यायालयात जाऊन याचिका करून खटला लांबवत होते. पण आज या सर्व हिंदुत्वनिष्ठांना तब्बल सहा वर्षांनी जामीन मिळाला, याबद्दल आम्ही ईश्वरचरणी कृतज्ञता व्यक्त करतो, असे श्री. अभय वर्तक म्हणाले.



# आपल्या कर्तृत्वाने आपली गुणवत्ता दाखवा

## - सिने अभिनेता पंढरीनाथ कांबळे




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : आपल्या स्वकर्तुत्वाने,व गुणवत्तेने तुम्ही मोठं व्हा,आपल्यातील गुणवत्ता सिद्ध करा. आपल्या कामातून ते लोकांना दाखवून द्या.मग तुम्हाला लोकं ओळखू लागतील तुमची गुणवत्ता म्हणजे तुमची उंची आहे.असे उदगार सुप्रसिध्द मराठी अभिनेते, बिग बॉस फेम पंढरीनाथ कांबळे उर्फ पॅडी यांनी वासिंद येथे काढले.

वासिंद येथील सरस्वती विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा मंगळवारी सायंकाळी पार पडला या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून अभिनेते पंढरी कांबळे उपस्थित होते.यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला ते म्हणाले मी म्यूनिसिपल शाळेत शिकलो आहे.मला त्यावेळी संस्थेची पाठ्य पुस्तक व गणवेश मिळत होते तरीही मी मोठ्या कष्टाने शिकलो अशी शालेय आठवणं सांगताना पॅडी म्हणाला तसेच पालकांनी आपल्या मुलामध्ये कोणती आवड आहे हे पाहून त्याच्या कलागुणांना वाव दया व प्रोत्साहीत करा म्हणजे तो अधिक चुणूक दाखवून तो यशस्वी होईल त्याच्या मागे तु हुशार मुलांसारखा नाही तु डॉक्टर, वकील इंजिनिअर, वर्ग 1अधिकारी झाला पाहीजे असा तगादा लावून त्याला नाउमेद करू नका असाही मौलिक सल्ला पालकांना दिला. मी कॉलेजमध्ये असताना मला पाचशे रुपयाची शिष्यवृत्ती मिळाली होती.त्या पैशाचं मोलं व महत्त्व मला आजही आहे.अशा आठवणी त्यानं जागविल्या माझ्या कॉलेज मित्रांनी मला पंढरीचा पॅडी केला.आणि हा पॅडीला महाराष्ट्रात एक कलाकार म्हणून ओळख मिळाली आज मी कलाकार म्हणून तुमच्यासमोर उभा आहे.असं सांगत तो म्हणाला या पॅडी ला शाळेत किंवा कॉलेज मध्ये असताना एकही बक्षीस कधीच मिळालं नाही परंतु कलाकार झाल्यानंतर माझ्याकडून विद्यार्थ्यांना बक्षीस देण्याचं भाग्य मला लाभलं आहे यात मला मनापासून खूप आनंद वाटतो आहे.असे भावनिक उदगार त्याने काढले.ते पुढे म्हणाले तुम्ही कधीच मनामध्ये न्युनगंड बाळगू नका तुम्ही कसं दिसता त्यापेक्षा तुमच्याकडे काय स्किल आहे.कला आहे.त्यातून तुम्ही स्वतःला सिद्ध करा मग सगळेजण तुमचं तोंडभरून कौतुक करतील असं शेवटी आपल्या भाषणात कांबळे म्हणाले.या सोहळ्यात सरस्वती विद्यालयातील गुणवत्ता विद्यार्थी व विशेष म्हणजे निवृत्त शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते खास गौरव करण्यात आला. सोहळयासाठी सरस्वती विद्यालयाच चेअरमन लडकू पवार, सेक्रेटरी रविंद्र शेलार,तसेच संचालक मंडळ व प्राचार्य एम.ए.कांबळे,पर्यवेक्षक व्ही टी भोईर,के. एन.धनगर यांनी उपस्थित शिक्षण प्रेमी पालक सन्मानीय सभासद यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले तर कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन सांका प्रमुख सचिन गु. भोईर व सांका मंडळाचे सदस्य मुकेश दामोदरे, शांताराम भोईर, किसन निचिते, नामदेव जाधव, सुवर्णा वेखंडे, काबाडीमॅडम, कुमावत मॅडम यांनी केले यावेळी शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी वृंद व विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गांजा विकणारी आंतरराज्य टोळी जेरबंद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे यांनी परिमंडळ ३ कल्याण स्तरावर अवैध धंदयावर कारवाई करणेकरिता विशेष पोलीस पथक स्थापन केले असून या पथकाने गांजा अंमली पदार्थ विकणाऱ्या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश केला आहे. डोंबिवली पोलीस स्टेशन व पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, कल्याण पथकाने दोन दिवसांत संयुक्तपणे केलेल्या कारवाई दरम्यान एकुण ५ लाख ९७ हजार ७८० रुपये किंमतीचा २९ किलो ९५५ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला असुन एकुण ३ आरोपींना अटक करण्यात आली असल्याची माहिती पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी दिली.

विशेष पथकातील पोलीस उपनिरीक्षक प्रसाद चव्हाण व पोलीस पथक मंगळवारी गस्त करीत असताना दुपारी १२:१५ वा. आयरेगांव, डोंबिवली पुर्व येथे एक इसम संशयास्पदरित्या लपण्याचा प्रयत्न करित असताना, त्यांस पळुन जाताना पकडले. या इसमाच्या ताब्यातील प्लास्टीकच्या पिशवीची झडती घेतली असता, त्यामध्ये ७ किलो ६६ गॅम वजनाचा १ लाख ४० हजार रुपये किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ मिळुन आला. डोंबिवली पूर्वेत राहणाऱ्या या आरोपीचे नांव किरण शहा, वय ४२ वर्षे, त्याच्या विरुद्ध डोंबिवली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करत त्याला गुन्हयात अटक करण्यात आले आहे. हा गांजा त्याने कोठुन व कोणाकडुन आणला आहे, तसेच तो येथे कुणाला विक्री करणार आहे, याबाबत अधिक तपास सुरू असून या गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक गोरखनाथ गाडेकर हे करित आहेत.

तसेच आज विशेष पथकातील पोलीस उप निरीक्षक प्रसाद चव्हाण यांना मिळालेल्या गुप्त बातमीच्या अनुषंगाने चोळेगांव तलाव, डोंबिवली पुर्व येथे सापळा लावुन थांबलेले असतांना, दुपारी एक वाजण्याच्या सुमारास येथे मध्य प्रदेश येथील सचिन मोरे (२१) व संजु लुहार (२४) हे दोन इसम आले. त्यांना थांबवुन, त्यांच्या बॅगेची झडती घेतली असता, या दोघांच्या बॅगेमध्ये २२ किलो, ८८९ गॅम वजनाचा ४ लाख ५७ हजार ७८० रुपये किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ मिळुन आला. या दोन्ही आरोपींविरुद्ध डोंबिवली पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करत अटक करण्यात आली आहे. या गुन्हयाचा पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक अच्युत मुपडे हे करित आहेत.



५ लाख ९७ हजार ७८० रुपये किंमतीचा २९ किलो ९५५ ग्रॅम गांजा जप्त ; तीन जणांना केली अटक

# भाताचे कोठार होणार डेटा हबची राजधानी

**रायगड जिल्हा भाताचे कोठार ओळख पुसून डेटा हबची राजधानी बनणार – सी.आर.म्हात्रे**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : भरपूर पाऊस,मोठा सागरी किनारा, या निसर्गदत्त भूमीत आगरी, कोळी बांधव आपली उपजीविका करत आले,भात आणि मासे हे प्रमुख अन्नअसणारी ही जीवनशैली काही वर्षानंतर लोप पावणार आहे.. याचे प्रमुख कारण म्हणजे मुंबई,नवी मुंबई... या स्थापनेनंतर आत्ता सरकारचा तिसरा डोळा या रायगड जिह्यात उघडणार आहे.... कोणी कितीही आडकाठी आणली तरी हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा ड्रीम प्रोजेक्ट साकार करणार अशे चित्र दिसू लागले आहे....लोकांना आपले सरकार आहे यासाठी सरकार विविध ठिकाणी लोकांची मानसिकता तयार करत आहे...प्रत्येक किल्ल्यावर तिरंगा फडकाविला आहे...सागर किनारा याची सीमा तपासणी सुरू केली आहे.. सागरी वाहतूक कमी खर्चात,कमी त्रासात होत आहे त्यामुळे समुद्र किनाऱ्यावर मोठमोठे प्रोजेक्ट बसविले जात आहेत...आपल्या जिल्ह्यात १५०० प्रोजेक्ट कार्यान्वित आहेत. या माध्यमातून साडेतीन लाख रोजगार निर्मिती झाली आहे असा सरकारी आकडा दाखवीत आहे.मात्र रायगड जिल्यातील बेरोजगार समस्या कायम आहे...मुख्यमंत्री महोदय यांनी दाओस येथे जागतिक आर्थिक औद्योगिक परिषदेतून मोठे करार केले आहेत ते तिसऱ्या महामुंबई, मुंबईचे असणार हे नक्कीच . सर्व पायाभूत सुविधा वीज पाणी ,रस्ता,लोहमार्ग, जलमार्ग,हवाई मार्ग. निसर्गाचा समतोल. याचा विचार करून जगातील स्पर्धा करणारे मुंबई महानगर असणार असे सांगितले जाते. आरसीएफ,रिलायन्स,jsw, यांचा विस्ताराचा आराखडा तयार केला असून,तांत्रिक बाबी पूर्ण करून योग्य वेळी तो समोर येणार आहे.... योग्य पायाभूत सुविधा मिळाल्यानंतर त्याचा परिणाम म्हणून ८३ हजार कोटी रुपयांचे सिमी कंडक्टर प्रोजेक्ट निर्माण होणार,त्यातून रोजगार निर्मिती.होईल अजून ५० हजार कोटीची गुंतवणुकीची घोषणा केली आहे.त्यातच,दिघी पोर्ट यासाठी ३८हजार कोटीची गुंतवणुकीची मंजुरी मिळाली आहे.रायगड जिल्ह्याचे निर्यातीमध्ये तब्बल ५२हजार कोटीचे योगदान आहे. एवढं महत्व जिल्ह्याचे आहे.ज्याप्रमाणे तेलाला महत्त्व तसाच डेटा हबच महत्व लक्षात घेता देशपातळीवरील डेटा हब ६५ टक्के रायगड,नवी मुंबई येथे तयार होणार आहे,यानंतर या भाताचे कोठार डेटा हब ची राजधानी म्हणून ओळखण्यात येईल.या डेटा ची व्हॅल्यू फार मोठी असेल,दिघी पोर्ट,जेएनपीटी पोर्ट आर्थिक परिस्थिती सुधारणार आहेच,या इको सिस्टीमने मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होणार आहे...बंदर विकास म्हणजेच जलमार्ग सोयीचे असल्याने सरकारचे लक्ष किनाऱ्यावर जास्त असते. नवी मुंबई विमानतळ यातून विकास करायचा आहे असे प्रतिपादन केले आहे..महत्वाचं मूळ विषय रायगड भाताचे कोठार संपणार हे नक्कीच.रेवस बंदर विकास बॅरिस्टर अंतुले साहेब मुख्यमंत्री असताना होणार होता पण मध्यंतरी त्याला खीळ बसली,आणि आता त्यासाठी तब्बल २५ कोटीचा निधी मंजूर झाला आहे.यामागचे कारण MMRDA साठी पोषक वातावरण हेच होय.किती रोजगार उपलब्ध होईल,किती मनुष्यबळ त्या प्रकारचे शिक्षण अपेक्षित आहे.विकास करायचा आहे नक्की पण MMRDA ज्या पिकत्या जमिनी घेणार आहे.त्या जमिनी घेतल्यावर जादूची कांडी फिरवावी तशा विकास लगेच होणार नाहीच..मग ह्यांच्या जमिनी घेतल्यानंतर त्यांच्या उपजीविकेचे साधन कोणते.शेवटी सर्व पोटावर चालते. तशे शेतकऱ्यांना सास्वत उत्पन्न नसणार ते कसे मिळणार ही फार मोठी समस्या आहे. आमचे शेतकरी स्वप्नात आहेत, रग्गड पैसा मिळेल,पण त्यांना विना पैसा विकास हे motto (ब्रीदवाक्य) MMRDA चें त्यांना माहीत नाही. आमचा शेतकरी,गेल पाइप,अलिबाग विरार मार्ग,सेझ,या विविध समस्येने ग्रासला आहे. पाण्याविना तडफड वेगळीच...असो आले देवाजीच्या मना तेथे कोणाचे चालेना.. शेतकऱ्यांना जगण्यासाठी लागणारी पुंजी द्या आणि विश्वासात घेऊन विकास करा. शेतकरी जगला पाहिजे..हेच मागणे आत्ता अशी माहिती वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी.आर.म्हात्रे यांनी दिली.

# असोळे गावातील घर आगीत भस्मसात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मकर संक्राती नंतर सुर्य नारायण तापायला सुरुवात होते. उन्हाळा वाढत गेला की आगीचे प्रमाणही वाढते या आगित काही क्षणात सर्व काही भस्मसात होते. मुरबाड मधिल असोळे गावात असाच दुर्दैवी प्रकार घडला असून नामदेव गवाळे , शंकर गवाळे यांच्या राहत्या घराला दुपारच्या सुमारास अचानक आग लागली व आगित त्यांचे घर भस्मसात झाले. ग्रामस्थांच्या व अग्निशामक दलाच्या दोन गाड्यांच्या साह्याने आग विझवण्यात यश आले अन्यथा मोठा अनर्थ घडला असता. आगित गवाळे यांचे संपूर्ण राहते घर जळून खाक झाले असून आता त्यांच्यावर बेघर होण्याची वेळ आली आहे तसेच मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. आयुष्यभर काबाड कष्ट करून माणूस राहण्यासाठी घर बांधतो पण अशा घटनेमुळे क्षणात होत्याचे नव्हते होते. आगिचे नेमके कारण समजले नसले तरी शार्ट सर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.या घटनेचा मुरबाड महसूल विभागा कडून रितसर पंचनामा केला असला तरी शासनाकडून लवकरात लवकर व जास्तीत जास्त मदत मिळावी अशी अपेक्षा गवाळे बांधव व्यक्त करित आहेत.



असोळे येथील आगिची घटना समजताच अग्निशामक दलाचे दोन बंब पाठवले असून आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले आहे. आमच्या महसूल विभागाकडून घटनेचा पंचनामा करण्यात आला असून लवकर व जास्तीत जास्त मदत या कुटुंबाला शासनाकडून मिळण्यासाठी प्रयत्न करणार - अभिजित देशमुख, तहसिलदार मुरबाड

# स्टुडंटस फेडरेशनचे बेमुदत साखळी उपोषण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडीया (एसएफआय) शहापूर तालुका समितीच्या वतीने एकात्मिक आदिवासी प्रकल्पांतर्गत येणाऱ्या आश्रम शाळा,वसतिगृह सविधा व विद्यार्थ्यांच्या असलेल्या समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने बेमुदत व साखळी उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

शहापूर एकात्मिक आदिवासी प्रकल्पांतर्गत येणाऱ्या एकलव्य मॉडेल निवासी स्कूल,आश्रम शाळा व वसतिगृह तसेच जिल्हा परिषद शाळा यामधील विविध सुविधा तसेच विद्यार्थ्यांच्या असलेल्या शैक्षणिक व आरोग्य यासारख्या खूप गंभीर समस्या आहेत तरीसुद्धा प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. त्या समस्या सोडवण्यासाठी पत्रव्यवहार करून सुद्धा याकडे दुर्लक्ष होत असल्याने येत्या 31 जानेवारी रोजी पासून प्रकल्प कार्यालय जवळ शहापूर तालुका एसएफआय समितीने एकत्रितपणे बेमुदत व साखळी उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, यासंदर्भात स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडीया (एसएफआय) वतीने शहापूर एकात्मिक आदिवासी प्रकल्प विभाग कार्यालयात निवेदन देण्यात आले असून शालेय सुविधा बाबत व विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी बेमुदत व साखळी उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी